**राज्यातील कुटीर व सूक्ष्म उद्योगांना त्यांच्या व्यवसायायामध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची योजना महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) मार्फत राबविण्याची योजना.**

**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण**
**(महाराष्ट्र शासनाची संस्था)**
**स.नं.१९१, फेज-१, म्हाडा वाणिज्य संकुल,**
**दुसरा मजला, त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे - ४११००६.**

**प्रस्तावना :-**

राज्यातील विजेची वाढती मागणी व पुरवठा यामधील तफावत लक्षात घेता तसेच दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा करण्याच्या दृष्टीने पर्यायी ऊर्जा स्रोतांचा अवलंब करुन पर्यावरण पोषक वीज निर्मिती करणे ही महत्वाची बाब ठरली आहे. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपैकी सौर ऊर्जा हा एक अत्यंत महत्वाचा स्रोत आहे. सदर ऊर्जा ही शाश्वत व निरंतर स्वरुपाची आहे. तसेच शाश्वत विकास लक्ष (Sustainable Development Goal) साध्य करायचे असल्यास या ऊर्जा स्रोतांचा वापर करणे गरजेचे आहे.

राज्यातील विविध लहान व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायामध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तसेच या व्यवसायिकांना मोठ्या प्रमाणात विजेची गरज असते. यामध्ये प्रामुख्याने लॉन्ड्री व्यवसाय / मत्स्यव्यवसाय / पशुसंवर्धनावर आधारित व्यवसाय / महिला बचट गटाचे लघु उद्योग / पीठ गिरणीचा व्यवसाय यासारख्या व्यावसायिकांना विजेच्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. विजेची अनियमितता व वाढीव खर्च याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर व अर्थाजनावर होत आहे. यामुळे हा समाज पारंपरिक व्यवसाय सोडून अर्थाजनासाठी इतर मार्गांचा अवलंब करत आहे.

या दृष्टीने करावयाच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून त्यांचा व्यवसाय योग्यरितीने वृद्धींगत होण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर सहाय्यभूत ठरू शकतो. यासाठी अशा व्यावसायिकांना सौर विद्युत संच आस्थापनेसाठी विशेष सहाय्य करणे महाऊर्जाच्या विचाराधीन होते.

**विवरण :-**

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या धोरणानुसार पारेषण संलग्न रुफ-टॉप प्रकारच्या १ कि.वॅ. ते २० कि.वॅ. क्षमतेच्या सौर विद्युत संयंत्रांकरिता राज्यामधील लॉन्ड्री व्यवसाय / मत्स्यव्यवसाय / पशुसंवर्धनावर आधारित व्यवसाय / महिला बचट गटाचे लघु उद्योग / पीठ गिरणीचा व्यवसाय यासारख्या व्यावसायिकांसाठी विशेष आर्थिक सहाय्य देणे गरजेचे आहे. अशा व्यावसायिकांना सौर विद्युत संचाच्या आधारभूत किंमतीच्या ५० टक्के इतके अर्थसहाय्य महाऊर्जा स्वनिधीतून देण्यात येईल.

वित्त वर्ष २०१८-१९ व २०१९-२० साठी या योजनेअंतर्गत २००० कि.वॅ. क्षमतेपर्यंतच्या संयंत्रांसाठी अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. त्यामुळे "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर प्रस्तावांना मंजूरी देण्यात येईल.

**कार्यपद्धती :–**

- लाभार्थ्याचा व्यवसाय नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. संयंत्र आस्थापनेसाठी आवश्यक ती सावली विरहित मोकळी जागा उपलब्ध करुन देणे ही लाभार्थ्यांची जबाबदारी राहील.
- महाऊर्जाकडे नोंदणीकृत उत्पादकांकडून केंद्र शासनाने निश्चित केलेल्या तांत्रिक मोजमापांनुसार संयंत्र आस्थापित करुन घेणे आवश्यक आहे.
- संयंत्र आस्थापना पूर्ण झाल्यानंतर संबंधित उत्पादकाने महाऊर्जास कळविल्यानंतर संयंत्रांची तांत्रिक तपासणी करण्यात येईल. तांत्रिक तपासणीचा अहवाल विभागीय कार्यालयामार्फत मुख्यालयास प्राप्त झाल्यानंतर संबंधित उत्पादकास अनुदान वितरीत करण्यात येईल.

**लाभार्थी निवडीचे निकष :-**

- योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उद्योजकाचे प्रकल्प आस्थापणेसाठी स्वत:च्या मालकीची जागा अथवा प्रकल्प आस्थापणेची जागा कमीत कमी १५ वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर उपलब्ध असल्याबाबतचे दस्तावेज महाऊर्जास सादर करणे गरजेचे आहे.
- योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उद्योजकाने त्यांचा ५० टक्के लाभार्थी हिस्सा उपलब्ध असल्याबाबतचे स्वप्रमाणित पत्र देतील त्यांचे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर निवड करण्यात येईल.

**योजनेच्या तांत्रिक बाबी व परिमाण :-**

सौर विद्युत संच आस्थापित करुन सौर ऊर्जेद्वारे वीज तयार करुन त्याचा वापर पूरक स्वरुपात विद्युतीकरणासाठी करण्यात येईल. संयंत्र १ कि.वॅ. व पुढील क्षमतेमध्ये उपलब्ध आहे.

संयंत्रामध्ये सोलर मोड्युल, इन्व्हर्टर इ. घटकांचा समावेश राहील. संबंधित व्यवसायाच्या वीज वापराच्या आवश्यकतेनुसार व उपलब्ध सावली विरहीत जागेनुसार सौर विद्युत संचाची क्षमता व इन्व्हर्टर क्षमता निश्चित करण्यात येईल. सौर विद्युत संचाची कमाल क्षमता २० कि.वॅ. एवढी असावी. या संयंत्रासाठी स्वच्छ सूर्यप्रकाश असलेली दक्षिणोत्तर सुयोग्य जागा निवडण्यात यावी.

**<u>योजनेची अंमलबजावणी</u> :-**

१. प्रस्तावांच्या अनुषंगाने तांत्रिक सर्वेक्षण करुन प्रकल्प अहवाल महाऊर्जाकडून तयार करण्यात येईल. त्यामध्ये कार्यालयातील विजेच्या वापरासंबंधीची सर्व माहिती संकलित करावी. सर्वेक्षणानंतर आस्थापित करावयाच्या संयंत्राची क्षमता व प्रकार यांची निश्चिती करण्यात येईल.

२. सर्वेक्षण व प्रकल्प अहवालानुसार सौर विद्युत संच (संयंत्र) आस्थापित करण्यासाठी महाऊर्जाने निश्चित केलेल्या उत्पादकांमार्फत संयंत्र आस्थापित करण्यात येईल.

३. संयंत्रे आस्थापित झाल्यानंतर ती संबंधितांना हस्तांतरित करण्यात येईल. संयंत्र आस्थापनेनंतर ५ वर्ष देखभाल व दुरुस्ती तसेच संयंत्र कार्यरत ठेवण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार / उत्पादक यांची राहील. परंतु संयंत्राची दैनंदिन देखभाल करण्याचे काम संबंधित लाभार्थ्यांकडून करण्यात येईल.

४. संयंत्रे आस्थापित झाल्यानंतर संबंधित लाभार्थीस दैनंदिन देखभाल व्यवस्थापनाविषयी पुरवठादारामार्फत प्रशिक्षण देण्यात येईल.

५. संयंत्र आस्थापित झाल्यानंतर ५ वर्षांचा कालावधी हा पुरवठादार / उत्पादकाचा हमी कालावधी राहील. सदर कालावधीत पुरवठादार / उत्पादकाने प्रत्येक तिमाहीस एकदा संयंत्रास भेट देऊन सर्व्हिसिंग करावे. दर तिमाहीस संयंत्र कार्यरत असल्याबद्दल अहवाल पुरवठादार / उत्पादकाने लाभार्थ्याच्या स्वाक्षरीनिशी संबंधित महाऊर्जा विभागीय कार्यालयास पाठवावा. संयंत्र कार्यरत असल्याबद्दल वार्षिक अहवाल पुरवठादार/उत्पादकाने लाभार्थ्याच्या स्वाक्षरीने महाऊर्जाकडे पाठवावा. हमी कालावधीनंतर संयंत्राची देखभाल दुरुस्ती करण्याकरिता संयंत्र पुरवठादार / उत्पादक यांच्याबरोबर वार्षिक दुरुस्ती करार करुन संबंधित लाभार्थीने संयंत्र कार्यरत ठेवावे.

६. सदर योजना राबविण्यासाठी महाऊर्जामार्फत पारेषण संलग्न रुफटॉप सौर विद्युत संयंत्र आस्थापित करण्यासाठी स्वारस्याच्या अभिव्यक्ती (Expression of Interest) अन्वये वित्तवर्ष २०१८-१९ साठी निश्चित केलेल्या उत्पादकांचा वापर करण्यात येईल.

७. योजनेत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर प्रस्तावांना मंजूरी देण्यात येईल. त्याशिवाय निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान वितरीत करण्यात येईल.

८. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार महाऊर्जाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना काढण्यात येतील.

**<u>योजनेचे मूल्यमापन</u> :-**

- संयंत्रे आस्थापित करताना तसेच आस्थापित केल्यानंतर त्यांची तपासणी करण्याची जबाबदारी महाऊर्जा विभागीय कार्यालयाची राहील. संयंत्रे कार्यान्वित ठेवण्याच्या दृष्टीने संबंधित लाभार्थ्यांना पुरवठादार संयंत्रे आस्थापित करतांनाच दैनंदिन देखभालीच्या दृष्टीने योग्य ते प्रशिक्षण देतील.
- प्रत्येक ६ महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित लाभार्थ्याने संयंत्राच्या कार्यरतेबाबत तपासणी करुन महाऊर्जास कळविणे बंधनकारक राहील.

**<u>आर्थिक तरतूद</u> :-**

सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रु.५०० लक्ष इतकी तरतूद करण्यात येत आहे.

महासंचालक
महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,
पुणे